VOL- VI ISSUE-X OCTOBER 2019 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 5.707 ISSN 2349-638x

# पंडिता रमाबाई - महाराष्ट्रातील प्रेरणादायी कन्या

**विश्वास गोरखनाथ वळवी,**
संशोधक विध्यार्थी सामाजिक शास्त्रे प्रशाळा,
इतिहासविभाग,कबचौउमवि,जळगाव

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र हा आज अनेक स्त्री-पुरुषांच्या कार्यकार्तुत्वर उभा आहे.महात्मा फुले,डॉ बाबासाहेब आंबेडकर,कर्मवीर भाऊराव पाटील,यशवंतराव चव्हाण,सावित्रीबाई फुले,रमाबाई रानडे.नावे कमी पळतील.पंडिता रमाबाई या महाराष्ट्राच्या स्त्रीभूषण आहे.विधवा आणि गरीब-गरजवंत स्त्रियांच्या अंधारात प्रकाश टाकणाऱ्या ज्योती आहे.आपल्या लेखणीतून भारतीय स्त्रियांचे अधिकारविहीनित्व, दुख आणि अश्रूंच्या वाचा फोडणाऱ्या रमाबाई खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील स्त्रियांच्या उद्धारक होत्या.ख्रिस्ती धर्म जरी त्यांनी स्वीकारला तरी आपली कर्मभूमी महाराष्ट्राला कधी सोडले नाही.एका ब्राह्मण कुटुंबातून ख्रिस्ती परिवारात प्रवासीत होतांना,हिंदू तत्वज्ञानातून पवित्र बायबलच्या तत्वज्ञानात प्रवासीत होतांना,वेदाच्या श्लोकातुन पवित्र वचनाचा खोलीत प्रवासीत होतांना,आपल्या डोळ्यादेखत वडील,पती,आणि मूलगी यांची प्रेते अनुभवून ख्रिस्ताला जाणून घेतांना,पंडिता रमाबाई खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील ख्रिस्ती समाजासाठी अभिमानात्मक देवाची दूत म्हणून मान्य पावली,यात कोणालाही आपत्ती होणार नाही.पंडिता रमाबाईचा शोध हा त्याकाळी जसा मौल्यवान होता आज ही आहे,ज्या स्त्रीने आपल्या ज्ञानाने महाराष्ट्राबरोबर अनेक राज्यांतील बुद्धिवंत लोकांना ज्ञान पाजलेल्या रमाबाई आज महाराष्ट्रातील ख्रिस्ती समाज आणि इतर समाज बांधवांसाठी ज्ञानवंत वृक्ष आहेआणि आज महाराष्ट्रातील भरपूर लोक या ज्ञानवंत वृक्षातील फळातून आपले ज्ञानार्जन करीत आहे.

**पंडिता रमाबाई:-जन्म आणि सुरुवातीचा काळ:-**

*"महाराष्ट्रीय स्त्री!कर्नाटकातून आलेली,बावीस वर्षे वयाची,तरी अद्याप अविवाहित,संस्कृत भाषेत बोलते,बोलते इतकेच नाही तर संस्कृतमध्ये कवनेही रचते आणि तीही जागच्या जागी... सारेच विलक्षण,सारा सुशिक्षित महाराष्ट्र खडबडून जागा झाला,बाईबद्दल येथील विद्वान शोध घेऊ लागले.त्यांना जे शोध लागले व लागत राहिले त्यांनी सुशिक्षित महाराष्ट्राला अधिकच धक्के दिले.त्यांना जागृत केलेविचार करायला लावले,काम करायला लावले"१* पंडिता रमाबाई यांनी आपल्या महाराष्ट्रातील प्रवासात अनेक धार्मिक बाबी शिकून घेतल्या अठरा हजार श्लोक पाठांतर केलेल्या एका बाविश वर्षीय कन्येचे ज्ञान देण्याची जेव्हा ब्राह्मण मंडळीने ऐकेले तेव्हा ते चकित झाले.हे या ज्ञानाची फळे त्यांना पुढे ख्रिस्ती धर्माच्या तत्वज्ञानात विलीन करतील हे त्यांना देखील माहित नव्हते.

**" कर्नाटकात जन्मलेल्या रमा डोंगरेला कानडी भाषा येत होती,वडिलांमुळे तिने संस्कृतवर प्रभुत्व मिळविले आणि रमा 'पंडिता रमाबाई सरस्वती' बनली.महाराष्ट्रात आल्यानंतर त्यांनी मराठीवरही प्रभुत्व मिळविले इग्रजी शिकून पुढे त्या इंग्लंड आणि अमेरिकेतही व्याख्याने देत फिरल्या.चाळीशी उलटल्यावर त्या आता बायबलच्या भाषांतरासाठी हिब्रू आईन ग्रीक भाषेचा अभ्यास करू लागल्या.मुक्ती सदनातील दीड-दोन हजार अनाथ मुली आणि महिलांची जबाबदारी असतांना पंडिता रमाबाई आपल्या विविध कार्यांचा व्याप सांभाळत असत हे विशेष."२** पंडिता रमाबाई यांनी शारदा सदन आणि मुक्ती मिशनच्या माध्यमातून महारष्ट्रात आणि भारतातील अनेक दलित पिडीत आणि अनाथ विधवा यांना जगण्याचे नवीन बळ दिले.आणि बचत गटामार्फत एक नवीन रोजगार देखील उपलब्ध करून दिला त्यामुळे लाचार आणि अबला स्त्रिया या स्वयंपूर्ण झाल्यामहाराष्ट्राच्या समाजसुधारनेत हि एक नवी क्रांती होती.

| अनु.क्र. | लिखाण | पुरस्कार/ पदव्या | संस्था | कार्य | जन्म आणि मृत्यू |
|---|---|---|---|---|---|
| १ | माझा इग्लंडचा प्रवास | पंडिता/ सरस्वती | आर्य महिला संघ | विधवा आणि अनाथ स्त्रियांमधील कार्य | जन्म. २३ एप्रिल १८५८. |
| २ | स्त्रीधर्मनिती | १९८९ ला भारत सरकारने पोस्टाचे तिकीट प्रसिद्ध करून पंडिता रमाबाई यांच्या गौरव केला | मुक्ती मिशन, केडगाव | ख्रिस्ती साहित्यात मोलाचे कार्य | मृत्यू. ४ एप्रिल १९२२. |
| 3 | युनायटेड स्टेसची लोकस्थिती | कैसर-ए-हिंद पदक,१९१९ | | ख्रिस्ती धर्माच्या स्वीकार केला. | |
| ४ | मूळ हिब्रू आणि ग्रीक मधून मराठी बायबलची रचियत: | | | अठरा हजार संस्कृत श्लोक पाठ. | |
| ५ | बालोद्यान | | | | |

**पंडिता रमाबाई यांच्या जीवनावरील प्रसिद्ध मते:-**

म्हणून **सरोजिनी नायडू** म्हणतात *"हिंदू संतमालिकेत जिचे नाव प्रविष्ट करण्यात येईल अशी पहिली ख्रिस्ती व्यक्ती"* ३.असे पंडिता रमाबाई च्या हिंदू संतमालिकेत गौरव करतात्तरी देखील मी एक संशोधक म्हणूनप्रखरपणे मांडू इच्छितो पंडिता रमाबाई जरी जन्माने हिंदू असल्या तरी त्या कर्माने आणि आत्म्याने खऱ्या ख्रिस्ती होत्या. म्हणून त्या आज ख्रिस्तात विलीन झालेल्या सर्वश्रेष्ठ संत महिला आहे. तसेच **फ्रान्सिस दिब्रिटो** यांच्या मताशी एक लेखक आणि भारतीय म्हणून मला आपत्ती नाही,पण एक ख्रिस्ती म्हणून पूर्णतः होकारही नाही .ते म्हणतात *"आपण ख्रिस्ताकडून तुकोबाकडे आलो आहोत.''* ४ पण खरे पाहता

***" आम्ही ख्रिस्ताकडून फादर थॉमस स्टीफन्सकडे आलेलो आहोत.आम्ही ख्रिस्ताकडून नारायण वामन टिळकांकडे आलेलो आहोत,आम्ही ख्रिस्ताकडून गॉर्डन हॉलकडे आलेलो आहोत,आम्ही ख्रीस्ताकडून रेव्ह हावर्ड कडे आलेलो आहोत,आम्ही ख्रिस्ताकडून पंडिता रमाबाईकडे आलेलो आहोत,आम्ही ख्रीस्ताकडून आचार्य नामदेव सूर्यवंशी कडे आलेलो आहोत,आम्ही ख्रिस्ताकडून फ्रान्सिस दिब्रिटोकडे आलेलो आहोत,आणि अंतिमतः ख्रिस्ताकडे जाणार आहोत"***

ज्या रमाबाईचे नाव देवाने पहिलेच त्याच्या अनंत जीवनाचा पुस्तकात लिहून ठेवलेले आहेतिला जगाचा कोणत्याच मालिकेत समाविष्ट करणे रास्त होईल का?,कारण पंडिता रमाबाई देवाच्या राज्यातील संत मालिकेत अगोदरच समाविष्ट आहे.कारण त्या देवाच्या दूत होत्याभारत अथवा महाराष्ट्रच्या नाही.देवाच्या दूत म्हणून त्या महाराष्ट्रात ख्रिस्ताच्या कार्यासाठी आणि सेवेसाठी संपूर्ण प्रज्वलित झाल्या आणि अंतिमतः ख्रिस्तात विलीन.महाराष्ट्रातील समाजसुधारणेत मोलाचे कार्य करणारी विदुषी आणि अठरा वर्षे पवित्र आत्म्याच्या साहाय्याने मूळ हिब्रू आणि ग्रीक भाषेतून पवित्रशास्त्राचे अनुवाद करून मराठी लोकांसाठी सुवार्तेचे द्वार खोलणाऱ्या पंडिता रमाबाई या खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील शोषितस्त्रीया आणि विधवा यांच्या प्रेणास्रोत आहेत.त्याचबरोबर आपल्या मराठी ख्रिस्ती साहित्यातून मराठी माणसाला ख्रिस्ताचे तत्वज्ञान उपलब्ध करून देण्यात ही त्याच्या मोलाचा वाटा आहे. "स्त्री धर्म नीती असो" वा "माझा इंग्लंडचा प्रवास"की युनायटेड स्टेटची लोकस्थिति त्यांनी आपल्या प्रखर लिखानातू समाजात चैत्यन निर्माण केले,आणि मुक्ती मिशनच्या माध्यमातून महाराष्ट्रात शिक्षणाबरोबरच बचत गटामार्फत अनेक योजना राबवून सामाजात आर्थिक स्थैर्य आणण्याचा पुरेपूर प्रयत्न केलापंडिता रमाबाई यांचा शारीरिक प्रवास जरी संपला असला तरी आज ख्रिस्ती समाज त्याच्या आध्यत्मिक आणि महाराष्ट्र त्यांच्या सामाजिक कार्यातून प्रेरणा घेऊन कार्यशील आहे.आज भारतात पंडिता रमाबाई च्या कार्यावर पाऊल टाकून अनेक ख्रिस्ती महिला पीडित

महिलांसाठी कार्यरत आहे.पंडिता रमाबाई म्हणजे ख्रिस्ती साहित्य आणि मानव कल्याणाचे प्रतीकच.

**पंडिता रमाबाई यांच्या अंतिम काळ:-**

पंडिता रमाबाई यांनी केलेले कार्य आज अजरामर झालेले आहे यात दुमत नाहीआपल्या सामाजिक आणि आध्यात्मिक कार्याने त्या ख्रिस्ती समाजातच नाही तर महाराष्ट्राच्या मातीत असलेल्या वाळूच्या प्रत्येक कणात त्यांच्या पवित्र कार्याच्या विरगळलेला सुगंध असून तो प्रत्येक माणूस सामाजिक कार्यासाठी घेत आहे.मराठी पवित्र बायबल पूर्ण करायला त्यांनी जीवनाची अनेक वर्षे मोजली मुक्ती मिशनच्या कार्यासाठी आपले संपूर्ण जीवन वाहून दिले.*'बायबलच्या मूळ हिब्रू आणि ग्रीक मधून याधर्मग्रंथाचे भाषांतर करणाऱ्या पंडिता रमाबाई सरस्वती या जगातील एकमेव महिला.पंडिता रमाबाईं च्या कन्या मनोरमाबाईंचे वयाच्या चाळीसाव्या वर्षी निधन झाले.आपल्या लाडक्या मुलीच्या मृतुच्या आघात रमाबाईंनी खंबीरपणे सोसला आणि बायबलच्या भाषांतराचे काम चालूच ठेवलेबायबलचे भाषांतर हे त्यांच्या अखेरच्या जीवनातील मिशन बनले होते.भाषांतर पूर्ण होण्याआधी आपला मृतू होऊ नयेअशी त्यांची तीव्र इच्छा होती.त्यांची हि इच्छा पूर्ण झालीरमाबाईंचे बायबलचे भाषांतर त्यांच्या स्वताच्या केडगावातील छापखान्यातच छापले जात होते.४ एप्रिल १९२२ रोजी पंडिता रमाबाई भाषांतराचे शेवटचे प्रुफ वाचून हातावेगळे केले आणि छपाईसाठी छापखान्यात पाठविले.त्यानंतर त्याच रात्री या महान समाजसेविकेने जगाचा निरोप घेतला.''*५ पंडिता रमाबाई यांनीहे दाखवून दिले स्त्री हि कधीही नमली नाही सत्याची कास धरून पुरुषांप्रमाणे समाजात महान कर्त्युत्व करू शकते. **हडसन टेलर म्हणतात ''देवाचे सर्व महान वीर हि कमकुवत होती तरी त्यांनी महान कृत्ये केली कारण देव त्यांच्या बरोबर आहे हे त्यांनी जमेस धरले.''६.**पंडिता रमाबाई या कधीच कमकुवत नव्हत्या कारण देव त्यांच्या बरोबर होता.***ना.वा. टिळक*** आपल्या एका अभंगात म्हणतात.

***"जिंकून मरणाला मरणाला!! जीव कुडींतून गेला!अक्षयतेचा अधिकारी हा!इकडून तिकडे गेला!!विश्वासाचा जिना चढोनी!दिव्य मंदिरी शिरला!!मेला नाही निजला क्षणभर!पुना:सुखाने उठला!!प्रभूने ह्याला किती दयेने!अजरामर हो केला!!''७***

पंडिता रमाबाई आज देवाच्या राज्यात अजरामर झाल्या त्या देवाच्या खऱ्या दूत होत्यात्यांनी केलेलं कार्य ९८ वर्षांनी देखील प्रेरणादायी आहे.पंडिता रमाबाई यांना वाचून विश्वासाची वाढ होते.**कारण ''जेव्हा संभाव्य संपतात आणि जेथे दृष्टी व संवेदना अपयशी ठरतात तेथे विश्वासाच्या आरंभ होतो** (जॉर्ज म्युलर)''८

एक ख्रिस्ती संशोधक म्हणून पंडिता रमाबाई बद्धल एवढेच लिहीन

***"मृत्यूला त्यांनी अमरत्वाचे थेंब पाजलेपंडिता रमाबाईं च्या कार्याने महाराष्ट्राला ख्रिस्ताच्या सुवार्तेने अनंतजीवनाचे खरे थेंब पाजले"***

पंडिता रमाबाई यांना ब्रिटीश सरकारने १९१९ साली कैसर-ए-हिंद-हे पदक देऊन त्यांच्या कार्याच्या गौरव केला,तसेच भारत सरकारनेही १९८९ त्यांच्या मृत्युनंतर पंडिता रमाबाई च्या नावाने पोस्टाचे तिकीट काढून त्यांच्या कार्यशील कर्तुत्वाच्या सन्मान केला.हा त्यांच्या कार्याच्या आणि महाराष्ट्राच्या गौरव होता जो त्यांनी मिळवून जनसामान्यांना मिळवून दिला.

**संदर्भग्रंथसूची-**

१) महाराष्ट्राची तेजेस्विनी पंडिता रामाबाई,देवदत्त नारायण टिळक,वाईट लाईट प्रकाशन. प्रथमावृत्ती. पुणे,१९६०,पृ क्र-१-२
२) ख्रिस्ती मिशनरीचे योगदान,पारखे कामिल,सुगावा प्रकाशन,प्रथमावृत्ती,२००३,पुणे,पृ.क्र.२२
३) महाराष्ट्राची तेजेस्विनी पंडिता रामाबाई,देवदत्त नारायण टिळक,वाईट लाईट प्रकाशन. प्रथमावृत्ती. पुणे,१९६०,पृ क्र-४६९
४) धर्मांतराबाबत पूल बांधूया,फ्रान्सीस दिब्रिटो,सकाळ-ई-पेपर,रविवार आक्टोबर १३.२०१९.वेळ,१२:००
५) उपरोक्त,ख्रिस्ती मिशनरीचे योगदान, पृ.क्र.२२
६) महाराष्ट्राची तेजेस्विनी पंडिता रामाबाई,देवदत्त नारायण टिळक,वाईट लाईट प्रकाशन. प्रथमावृत्ती. पुणे,१९६०,पृ क्र-४६१
७) ख्रिस्ती शिष्यत्व,विलियम मैक्डोनाल्ड,महान प्रीती प्रकाशन,दुसरी आवृत्ती२००६,पुणे,पृ.क्र.४१
८) उपरोक्त,ख्रिस्ती शिष्यत्व, पृ.क्र.४१